# मिरा भाईंदर महानगरपालिका

**सामान्य प्रशासन विभाग**
मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
दूरध्वनी क्र-022-28192828 ई-मेल आयडी- gad@mbmc.gov.in

जा.क्र. मनपा/ सा.प्र. / 292/2024-25 दि. 29/10/2024

## ॥ परिपत्रक ॥

कळविण्यांत येते की, **दि. २८ ऑक्टोंबर २०२४ ते ३ नोव्हेंबर, २०२४ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहीचे आयोजन करण्याच्या महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र: दजस-२०२४/प्र.क्र.४७/विचौ-२ (११-अ) दि.२४/१०/२०२४ रोजीच्या परिपत्रकानुसार सुचना दिल्या आहेत.**

**त्यानिमित्त** मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, दुसरा मजला येथे सकाळी ११.०० वाजता **मा. आयुक्त तथा प्रशासक मा. श्री. संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.)**, यांच्या उपस्थितीत मा. अतिरिक्त आयुक्त (सर्व), उपायुक्त (सर्व), शहर अभियंता व इतर सर्व अधिकारी/ कर्मचारी यांच्या उपस्थितीत भ्रष्टाचार निर्मूलन प्रतिज्ञा घेणेकरीता कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

तरी सदर कार्यक्रमास आपण उपस्थित रहावे.

**(कल्पिता पिंपळे)**
**उपायुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्रति,

---------------------

---------------------

---------------------

# प्रतिज्ञा

आपल्या देशाच्या आर्थिक, राजकीय आणि सामाजिक प्रगतीमध्ये भ्रष्टाचार हा प्रमुख अडथळा आहे असे मला वाटते. भ्रष्टाचार निर्मुलनासाठी सरकार, नागरिक आणि खाजगी क्षेत्र या सर्व घटकांनी संघटितपणे काम करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

प्रत्येक नागरिकाने दक्ष राहायला पाहिजे आणि सदैव प्रामाणिकपणा व सचोटी यांच्या उच्चतम मानकांप्रती वचनबध्द असायला हवे आणि भ्रष्टाचाराविरुध्द लढा देण्यासाठी साथ दिली पाहिजे याची मला जाणीव आहे.

म्हणून मी प्रतिज्ञा घेतो की :

- जीवनाच्या सर्व क्षेत्रांत सच्चेपणा आणि कायद्याचे पालन करेन.
- लाच घेणार नाही आणि लाच देणार नाही.
- सर्व कामे प्रामाणिकपणाने आणि पारदर्शक पद्धतीने करेन.
- जनहितासाठी कार्य करेन.
- व्यक्तिगत वागणूकीत सचोटी दाखवून उदाहरण घालून देईन.
- भ्रष्टाचाराच्या कोणत्याही घटनेची माहिती योग्य अभिकरणास देईन.